**गट शेतीस प्रोत्साहन व सबलीकरणासाठी शेतकऱ्यांच्या गट शेतीस चालना देणे ही योजना राबविण्यास मान्यता.**

# महाराष्ट्र शासन

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

शासन निर्णय क्रमांकः कृविका-२०१७/प्र.क्र. ३२/३-अे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक : १३ एप्रिल, २०१८

<u>वाचा</u> :

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. कृविका-२०१७/प्र.क्र. ३२/३-अे, दि. २४ जुलै , २०१७

२) शासन पुरक पत्र, कृषि व पदुम विभाग, क्र. कृविका-२०१७/प्र.क्र. ३२/३अे, दि. १ सप्टेंबर, २०१७

३) शासन पुरक पत्र, कृषि व पदुम विभाग, क्र. कृविका-२०१७/प्र.क्र. ३२/३अे, दि. १७ ऑक्टोबर, २०१७

४) आयुक्त ( कृषि ) यांचे पत्र क्र. संचा. आत्मा/गट शेती/२२८/२०१७, दि. ०१ ऑगस्ट, २०१७

५) आयुक्त ( कृषि ) यांचे पत्र क्र. संचा. आत्मा/गट शेती/४०३/२०१७, दि. ११ डिसेंबर, २०१७

६) आयुक्त ( कृषि ) यांचे पत्र क्र. संचा. आत्मा/गट शेती/४५१/२०१७, दि. २२ डिसेंबर, २०१७

७) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांचे पत्र क्र. संचा.आत्मा/गट शेती/४६/२०१८, दि.३० जानेवारी, २०१८

**<u>प्रस्तावना :</u>**

उपरोक्त वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये "गट शेतीस प्रोत्साहन व सबलीकरणासाठी शेतकऱ्यांच्या गट शेतीस चालना देणे" ही योजना सन २०१७-१८ मध्ये राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. वाचा क्र. २ येथील शासन पुरक पत्रान्वये शेतकरी गटाने सदर योजनेसाठी जर उत्पादन व विक्री व्यवस्थेच्या मुल्य साखळी (Forward/Backward linkage) बाबतचा करार केला असेल अशा शेतकरी उत्पादन गटास गट शेती योजनेअंतर्गत प्रथम प्राधान्य देण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे. तसेच उपरोक्त वाचा क्र. ३ येथील शासन पुरक पत्रान्वये सदर योजनेअंतर्गत प्रकल्प आराखडा सादर केल्यानंतर मंजूरीस होणारा विलंब टाळण्यासाठी जिल्हास्तरीय समितीने संचालक ( विस्तार व प्रशिक्षण ) यांना प्रकल्प आराखडा सादर केल्यानंतर संचालक ( विस्तार व प्रशिक्षण ) यांनी काही बदल असल्यास ते जिल्हास्तरीय समितीस १५ दिवसाच्या आत सुचवावेत तसेच आराखडा सादर केल्यानंतर १५ दिवसात सूचना प्राप्त न झाल्यास आराखडा मंजूर झाल्याचे समजण्यात येईल अशी सुधारणा उपरोक्त वाचा क्र. १ येथील शासन निर्णयामध्ये करण्यात आली आहे. गट शेतीस प्रोत्साहन व सबलीकरणासाठी शेतकऱ्यांच्या गट शेतीस चालना देणे" योजनेसंदर्भातील उपरोक्त वाचा क्र.१ येथील शासन निर्णयामध्ये अनुदान वाटपाच्या टप्पे, ग़ट निवडीचे अधिकार जिल्हास्तरावर प्रदान करण्याबाबत यासंदर्भात सुधारणा करण्याबाबत तसेच कृषि व संलग्न विभागाच्या योजनांमध्ये समाविष्ट नसलेल्या घटकांचा समावेश प्रस्तुत योजनेमध्ये करण्याबाबत आयुक्त ( कृषि ) यांनी उपरोक्त वाचा येथील क्र. ४, ५ , ६ व ७ येथील पत्रांन्वये शिफारस केली आहे. तदनूसार शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय :</u>**

उपरोक्त वाचा क्र. १ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. ५ - निधी वितरणाचे टप्पे ऐवजी सुधारित परिच्छेद क्र. ५ पुढील प्रमाणे वाचण्यात यावा .

**५. <u>निधी वितरणाचे टप्पे</u> : ( रु.१०० लाखाच्या मर्यादेत )**

"१) पहिला टप्पा : प्रकल्प मंजुरीनंतर लगेच - प्रकल्प किंमतीच्या ५ % रक्कम समुह निवड, व निर्मिती, सांघिक सहकार्य, समूह नोंदणी, बँकेशी जोडणी, समुह विकास आराखडा तयार करणे, सहली, प्रशिक्षण

कार्यशाळेचे आयोजन, प्रकल्प स्थळाची निवड अंतिम करून नोंदणी करणे इ. सदर निधीत तांत्रिक सल्लागारास दयावयाच्या मानधनाचा समावेश असेल.

२) दुसरा टप्पा : प्रकल्प किंमतीच्या ४५ % रक्कम सामुहिक सिंचन व्यवस्था निर्मिती, यांत्रिकीकरण व तंत्रज्ञानासंदर्भात सामुहिक अवजारे बँक निर्मितीसाठी तसेच सामुहिक पशुधन व व्यवस्थापन व अनुषंगिक कार्यक्रम राबविण्यासाठी.

३) तिसरा टप्पा : प्रकल्प किंमतीच्या ४०% रक्कम सामुदायिक संकलन, प्रतवारी, साठवणूक व प्रक्रिया केंद्राची निर्मिती, विपणन वाहतुक व्यवस्थेसाठी.

४) चौथा टप्पा : प्रकल्प किंमतीच्या १० % रक्कम - मंजुर आराखडयाप्रमाणे पहिल्या, दुस-या व तिस-या टप्प्यात झालेल्या अनुदानाच्या खर्चाचे मूल्यमापन करून अंतिम हप्ता अदा करणे "

२. उपरोक्त वाचा क्र. १ येथे नमूद केलेल्या शासन निर्णया**तील परिच्छेद** १ **मधील** मुद्दा क्र. ९ पुढील प्रमाणे सुधारित केल्याप्रमाणे वाचण्यात यावा.

९) सदर योजने अंतर्गत सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मध्ये प्रत्येकी २०० शेतकरी गट स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जिल्ह्यास दिलेल्या लक्षांकापेक्षा जास्त पात्र गटांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास सोडतीद्वारे गटांची अंतिम निवड जिल्हयास दिलेल्या आर्थिक लक्षांकास अधिन राहून जिल्हाधिकारी व त्यांचे अध्यक्षतेखालील समितीने करावी व निवड केलेले गट / शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी संचालक ( विस्तार व प्रशिक्षण ) यांच्याकडे पाठवावेत. कृषि आयुक्तालयाने मान्यता दिलेल्या गट / शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या प्रकल्प आराखड्यांना जिल्हाधिकारी व त्यांचे अध्यक्षतेखालील समितीने जिल्हास्तरावरच अंतिम मंजुरी प्रदान करावी. प्रकल्प आराखड्याप्रमाणे आर्थिक लंक्षाक शिल्लक राहत असल्यास अतिरिक्त गटांची निवड आर्थिक लक्षांकाच्या अधिन राहून करावी व वाढीव गटांच्या निवडीचे प्रस्ताव संचालक ( विस्तार व प्रशिक्षण ), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मान्यतेसाठी पाठवावेत. या योजनेची जिल्हास्तरावरील अंमजबजावणी व सनियंत्रणाची संपूर्ण जबाबादारी जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच २०० गटांची जिल्हानिहाय विभागणी कृषि आयुक्तालय स्तरावरून करण्यात येईल.

३. उपरोक्त वाचा क्र. १ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. २ मध्ये पुढील मुद्याचा समावेश करण्यात येत आहे.

अ) मशिनरीसाठी आवश्यक ते शेड बांधकाम

ब) सर्व प्रकारचे आवश्यक सयंत्र / मशिनरी

क) अंडी देणाऱ्या कोंबडयांसाठी जाळया व शेड बांधकाम

ड) सामुहीक विहीर व पाईपलाईन

इ ) सामुहीक इलेक्ट्रीक मोटार

ई) १ कोटी लिटरपेक्षा जास्त साठवणूक क्षमता असलेले सामुदायिक शेततळे

**फ**) गाई/म्हशी/शेळयांसाठी सामुदायिक गोठा बांधकाम

उपरोक्त नमूद बाबींसाठी कृषि व सलंग्न विभागाच्या प्रचलित योजनांतर्गत मापदंड मंजुर नसल्याने अशा बाबींकरीता संबंधित शेतकरी गट / उत्पादक कंपन्यांनी नोंदणीकृत मुल्यांकन करणा-याकडुन (Registered Value) किंवा संबंधित शासकीय यंत्रणेकडुन मुल्यांकन करून घ्यावे. संबंधित बाबीच्या मुल्यांकनानुसार एकुण खर्चाच्या ५० टक्के अनुदानाची रक्कम प्रस्तुत योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येईल.

४. तसेच पुढील नमूद बाबीकरीता संबंधित शेतकरी गट / उत्पादक कंपन्यांनी स्वत:च्या निधीतून खर्च करावा. त्यासाठी सदर योजनेच्या माध्यमातून अनुदान उपलब्ध करुन दिला जाणार नाही. उदा. पशुधन खरेदी (गाय, म्हशी, कोंबडया व शेळया), कार्यालय भाडे, स्टेशनरी, कार्यालयीन खर्च, फर्निचर, कार्यालय, बांधकाम, संगणक खरेदी, प्रयोगशाळेकरीता वापरले जाणारे कंझ्युमेबल्स, माल वाहतुकीची वाहणे इत्यादी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१३१५१३१८३१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kamlakar Yeshwant Vanjare

Digitally signed by Kamlakar Yeshwant Vanjare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c08eef62183520696d2005b153b8cc2a552337a23fc4d457a4434216d9324c3b, serialNumber=6fd0ddfb9412fda09432e5f8a3e140c065770ba4ca63ef6fc5ba354810e2828b, cn=Kamlakar Yeshwant Vanjare
Date: 2018.04.13 15:54:12 +05'30'

( क.य.वंजारे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त (कृषि ), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) संचालक (विस्तार व प्रशिक्षण ), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत-

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
२) मा.मंत्री ( वित्त ) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री ( कृषि ) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (कृषि ) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
५) सर्व विधानमंडळ सदस्य.
६) अपर मुख्य सचिव, ( वित्त ) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, नियोजन, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, पणन, वस्त्रोद्योग, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सचिव, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव ( जलसंपदा ) मंत्रालय, मुंबई.
११) सचिव (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई.
१२) सचिव (महिला बालकल्याण), मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव, जलसंधारण, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, वस्त्रोद्योग, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी,
१६) कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,

१७) कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर,

१८) कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी,

१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

२०) महालेखापाल १/२ ( लेखा परिक्षा )/ (लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई / नागपूर

२१) सर्व विभागीय आयुक्त

२२) सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आत्मा नियामक मंडळ

२३) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद तथा उपाध्यक्ष आत्मा नियामक मंडळ

२४) सर्व सह सचिव/ उप सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२५) अध्यक्ष, नाबार्ड, प्लॉट नं. सी-२४, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्लेक्स,बीकेसी रोड, बांद्रा ( पूर्व), मुंबई

२६) मुख्य महाव्यवस्थपक, नाबार्ड, पुणे ५, वेलस्ली रोड, पुणे-४११ ००५

२७) मुद्रांक व नोंदणी महानिरिक्षक, पुणे

२८) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, सर विठठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डींग, ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई-४

२९) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे

३०) सर्व विभागीय कृषि सहसंचालक

३१) सर्व प्रकल्प संचालक ( आत्मा ),

३२) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

३३) कृषि विकास अधिकारी, सर्व जिल्हा परिषद

३४) प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (POCRA ), वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई.

३५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

३६) सहायक संचालक, लेखा-१, कृषि आयुक्तालय, पुणे

३७) वित्त विभाग (व्यय-१) (अर्थसंकल्प-१२) (अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.३२

३८) नियोजन विभाग, कार्यासन १४१४, १४३१, मंत्रालय, मुंबई.३२

३९) अवर सचिव/राकृवियो कक्ष, कार्यासन अधिकारी,२- अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

४०) निवड नस्ती / कार्या-३अे, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय, मुंबई.